




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : २४५ ● पुणे ● रविवार, दि. १७ ऑगस्ट २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




धायरीत खंडोबा मंदिर परिसरात भव्य वृक्षारोपण 3



सहकार मंत्रालयाचे अथक प्रयत्न उल्लेखनीय 4

# गावकीचा विचार अन् भावकीवर सवाल

## भावकीकडे लक्ष दिले म्हणूनच तू आमदार झालास : अजित पवारांचा तोंडावर हास्य ठेवत रोहित पवारांना दम; नादाला न लागण्याचा इशारा

**सांगली (दै. आरंभ पर्व)**

भावकीने लक्ष दिले म्हणूनच तू निवडून आलासा, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी आमदार रोहित पवारांच्या गावकीच्या नादात भावकी विसरल्याच्या टीकेला सडेतोड प्रत्युत्तर दिले. यावेळी त्यांनी आपल्या चेहऱ्यावरील हास्य कायम ठेवत रोहित यांना अप्रत्यक्षपणे आपल्या नादाला न लागण्याचाही सल्ला दिला.



रोहित पवार यांनी सांगलीच्या इस्लामपूर येथे आयोजित एका कार्यक्रमात अजित पवारांना भावकीची आठवण करून दिली होती. अजित पवारांना गावकीच्या नादात भावकीचा विसर पडला आहे. त्यांनी निधीच्या बाबतीत कुठेतरी याचा विचार करावा, असे ते म्हणाले होते. त्यानंतर अजित पवारांनी लागलीच त्यांच्या या विधानाचा खरपूस समाचार घेतला. रोहित मघाशी बोलताना म्हणाला की दादांचे गावकीकडे लक्ष आहे, भावकीकडे नाही. पण भावकीकडे लक्ष दिले म्हणूनच तू आमदार झालास. आपण पोस्टल बॅलेटवर निवडून आला आहात हे लक्षात असू द्या. जयंतराव (जयंत पाटील) त्याला विचारा, किती मते पडली आहेत? असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी हसत रोहित यांना आपल्या नादी न लागण्याचाही सल्ला दिला.

मी महायुतीत गेल्यापासून कुणावरही टीका केली नाही. तुम्ही तुमच्या विचाराने चालत आहात, मी माझ्या विचाराने चालत आहे. पण त्यात आम्ही फुले शाहू आंबेडकरांच्या विचारधारेशी कुठेही तडजोड केली नाही. मला रोहितने सांगितले की, जयंत पाटील व मी हेलिकॉप्टरने जाईन. त्यावेळी मला वाटले की, ते माझे भाषण ऐकायला दोघेही नसणार. पण माझे नशीब बघा हे दोघेही भाषण ऐकायला आहेत, असे ते म्हणाले.

अजित पवारांनी यावेळी जयंत पाटील हे आवाजात प्रेमळपणा असणारे देखणे व्यक्तीमत्व असल्याच्या एका उल्लेखाचा दाखला दिला.

जयंत पाटील म्हणजे देखणे नेतृत्व. मग आम्ही देखणे नाही काय? कार्यक्रमाला वाळव्यात बोलवायचे आणि आमचीच बिन पाण्याने करायची, असे ते म्हणाले. त्यांचे हे विधान ऐकताच कार्यक्रमस्थळी एकच हशा पिकला.

तत्पूर्वी, रोहित पवारांनी आपल्या भाषणात अजित पवारांना टोला हाणला होता. ते म्हणाले होते, काही वर्षांपूर्वी अधिवेशनात मी भाषण केले होते. अनेक लोकांनी सांगितले की, भाषण चांगले झाले. मग मला अजितदादांचा फोन आला. त्यावेळी आम्ही पार्टी म्हणून एकत्र होतो. त्यांनी मला घरी बोलावले. माझी अपेक्षा होती की, ते माझ्या भाषणाचे कौतुक करतील. अजून चांगले भाषण कर असे म्हणतील. पण त्यांनी सांगितले, भाषण चांगले झाले, पण एक महत्त्वाची गोष्ट तुला सांगतो. भाषण देत असताना कॅमेरा तुझ्यावर फोकस असतो. त्यामुळे शर्टचे वरचे बटण वगैरे लावत जा. त्यांचे एवढे बारीक लक्ष माझ्यावर होते. आता ते गावकीचा विचार करतात, पण भावकीचा विचार कुठेतरी विसरलेत. कुठेतरी निधीच्या बाबतीत त्यांनी विचार करावा, असे ते मिश्किलपणे म्हणाले.

### खूप चुरूचुरू बोलायला लागलाय

**मी रोहितचे भाषण ऐकत होतो. खूप चुरूचुरू बोलायला लागला आहे, असे सांगून अजित पवारांनी स्वतःचे उदाहरण दिले. ते म्हणाले, 1990 साली मी, जयंत पाटील आर. आर. पाटील पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आलो. 1990, 1995 आणि 1999 असे तीन टर्म लागोपाठ निवडून आल्यानंतरही 1999 च्या आघाडी सरकारच्या काळात आम्हाला फार स्पेस मिळाली नाही. 2004 साली थोडी संधी मिळाली. पण हल्ली काही काही जणांना पहिल्या टर्मलाच भाषणबाजी करायची असते. मी म्हणजे कुणीतरी मोठा अशा अर्विभावात ते दुसऱ्या पक्षालाही सल्ले देत फिरतात.**

## ठळक बातम्या

### खेवलकरविरोधात आणखी एक गुन्हा

पुणे (आरंभ पर्व) : खराडी पार्टी प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते एकनाथ खडसे यांचा जावई डॉ. प्रांजल खेवलकर याच्याविरुद्ध सायबर पोलिस ठाण्यात शुक्रवारी आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला. खराडी येथील एका हॉटेलमध्ये २५ जुलै रोजी झालेल्या पार्टीवर गुन्हे शाखेने छापा टाकला होता. या प्रकरणात डॉ. प्रांजल मनीष खेवलकर, निखिल जेठानंद पोपटाणी, समीर फकीर महमंद सय्यद, सचिन सोमाजी भोंबे, श्रीपाद मोहन यादव, इशा देवज्योत सिंग आणि प्राची गोपाल शर्मा यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून २ ग्रॅम ७० मिग्रॅम कोकेनसदृश पदार्थ, ७० ग्रॅम गांजासदृश पदार्थ, हुक्का पॉट, दहा मोबाइल, सुगंधी तंबाखू, दोन कार, दारूच्या बाटल्या, असा मुद्देमाल जप्त केला गेला होता.

### मुलाने केला आईच्या खुनाचा प्रयत्न

पुणे (आरंभ पर्व) : दारू पिण्यास पैसे न दिल्याने एकाने आईवर चाकूने वार केल्याची घटना सिंहगड रोडवरील सावित्रीबाई फुले वसाहतीत घडली. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी पर्वती पोलिसांनी मुलाला अटक केली. कौशल्या पप्पू कांबळे (५५, रा. सावित्रीबाई फुले वसाहत, सिंहगड रोड) असे गंभीर जखमी झालेल्याचे महिलेचे नाव आहे. या प्रकरणी कौशल्या यांचा मुलगा कृष्णा (३०) याला अटक करण्यात आली. याबाबत कृष्णाचा मोठा भाऊ बाबासाहेब (३६) याने पर्वती पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कृष्णा कांबळे याला दारू पिण्याचे व्यसन आहे. तो काही कामधंदा करत नाही. तो दारू पिण्यासाठी सतत पैशांची मागणी करून आईला त्रास देत होता. पैसे न दिल्याने त्याने आईला शिवीगाळ केली. गुरुवारी पहाटे साडेचारच्या सुमारास त्याने आई कौशल्या यांच्यावर चाकूने वार केले. छातीत चाकूने भोसकले.

# पुरंदर विमानतळ : शेतकऱ्यांचा मोबदला प्रलंबित

## शरद पवारांची मुख्यमंत्र्यांशी चर्चा होणार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुरंदर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनाच्या मोबदल्यात मिळणारा आर्थिक परतावा कमी असून त्यात वाढ करावी, अशी आग्रही मागणी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडे केली आहे. याबाबत पवार यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याशीही चर्चा केली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी याबाबत लवकरच चर्चा करून तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन शेतकऱ्यांना दिले.

या प्रकल्पासाठीच्या भूसंपादनावरून निर्माण झालेला प्रश्न अजूनही कायम आहे. या संदर्भात बाधित शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनी शनिवारी (दि. १६) राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. पुण्यातील साखर संकुल येथे झालेल्या या बैठकीत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडीही उपस्थित होते. या बैठकीत सुमारे २५ ते ३० शेतकरी पवार यांना भेटले. या वेळी शेतकऱ्यांनी राज्य सरकारकडून भूसंपादनापोटी देऊ केलेला मोबदला अपुरा असल्याचे सांगून त्यात वाढ करण्याची मागणी केली. तसेच केवळ आर्थिक मोबदला नव्हे, तर बाधित शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाची हमी व स्पष्ट धोरण जाहीर करण्यात यावे, अशी मागणीही केली. सरकारने एरोसिटीमध्ये विकसित भूखंड देण्याचा प्रस्ताव मांडला असला, तरी त्याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे. त्यामुळे यात हस्तक्षेप करून शेतकऱ्यांची बाजू सरकारकडे मांडावी अशी विनंती केली.

पवार यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. सुमारे तासभर ही चर्चा झाली. या चर्चेनंतर पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांशी याबाबत लवकरच चर्चा करून तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले, असे शेतकऱ्यांनी सांगितले. पुरंदर विमानतळ प्रकल्प गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. आता शरद पवार यांच्या सारख्या ज्येष्ठ नेत्याने या प्रश्नात लक्ष घातल्याने सरकारवर तोडगा काढण्यासाठी दबाव वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# हुतात्मा बाबू गेनू मंडळाची दहीहंडी सात थर लावून फोडली

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

'आम्ही गडचा डोंगरचे राहणार, जागर शिवबाचा करणार..', 'हाथी-घोडे-पालकी, जय कन्हैया लाल की', 'अरे दिवानो, मुझे पहचानो', 'में हूँ डॉन..', 'देखा तो तुझे यार..', "आजा सामी, बलम सामी...' अशा हिंदी-मराठी गाण्यांवर डीजेच्या दणदणाटात तरुणाई बिरकली. 'लेझर शो'चा झगमगाट, गोविंदा पथकांनी साकारलेला मानवी मनोऱ्यांचा थरार, आकर्षक विद्युतरोषणाई, तारे तारकांची हजेरी अन् लाखोंच्या बक्षिसांची उधळण...



अशा जल्लोषपूर्ण वातावरणात शनिवारी (दि. १६) दहीहंडी उत्सव साजरा झाला. त्याचवेळी शहरात डीजेमुक्त दहीहंडी साजरी करुन नवा पायंडा पाडण्यात आला.

दरम्यान, १७०० हून अधिक मंडळांनी मिळून तब्बल १७० कोटींची दहीहंडी फोडली असल्याचे चित्र आहे. दहीहंडी उत्सवाचा हा खर्च 'लेझर शो'प्रमाणेच डोळे दीपवून टाकणारा ठरला. शहर, जिल्हा आणि पिंपरी-चिंचवड मिळून अधिकृत दहीहंडी उत्सव मंडळांची संख्या १३२७ इतकी आहे. शिवाय शहरात सोसायटधांमध्ये, अंतर्गत रस्त्यांवर व ग्रामीण भागात गावा-गावांत साजऱ्या केल्या जाणाऱ्या दहीहंडी उत्सवाची संख्या विचारात घेतली तर हा आकडा १७०० च्या पुढे गेला आहे.










दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा



# अतिरेक नको!



कबुतर हे खरं तर शांततेचे प्रतीक. पण, या शांततेच्या प्रतीकानेच सध्या मुंबईत अशांतता निर्माण झाली आहे. शांतता, अहिंसा आणि जीवदयेवर अतोनात श्रद्धा असलेल्यांना आपल्या या श्रद्धेच्या समर्थनार्थ हातात चाकू-सुरे घ्यावे लागत आहेत! 'अहिंसेच्या रक्षणार्थ हिंसा झाली तरी हरकत नाही' यासारखी विधानंही कोणी करू लागले आहेत!! आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ भाषा वापरतानाही विवेकाची पातळी सोडू नये, ही शिकवण हल्ली लोप पावत चालली आहे. शिवाय, परमतसहिष्णुता म्हणूनही काही गोष्ट असते. दया, करुणा सहिष्णुतेची अनेक अंगं, अनेक आविष्कार आहेत. त्यातलं कुठलं एक दर्शनच खरं, तेच अंतिम असं मानणं म्हणजे 'विश्वाचं अंतिम सत्य आपल्यालाच उमगलं' असा दावा करण्यासारखं आहे. हा दावा कोणाला करायचा असेल, तर हरकत नाही. पण, त्यातून आपण आपल्यालाच परमपूजनीय असलेल्या महापुरुषांच्या पुढे जातो आहोत, हे समजून घेतलेलं बरं. उच्चरवात आक्रमक बोलणं हा सध्याच्या जमान्याचा रिवाजच झाला आहे. ज्यांची आत्मशांती हरवली आहे, असे लोक बाहेर अधिकाधिक वरच्या पट्टीत जातात. सर्वसामान्यांसाठी हे ठीक आहे. पण, ज्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य आत्मशांतीच्या शोधार्थ, आत्मिक अध्यात्मासाठी समर्पित केलं आहे, त्यांनी तरी समाजाला याचं भान दिलं पाहिजे. आपला तोल ढळणार नाही, याची काळजी स्वतःच घेतली पाहिजे. कबुतरांच्या विष्ठेने आणि त्यांच्या पंखांनी होणारं प्रदूषण आणि त्यातून माणसाला होणारे विकार राहिले बाजूला; त्याआधी हे प्रदूषण थांबवा, असं म्हणण्याची वेळ आली आहे. कबुतर हा संपूर्ण शाकाहारी पक्षी आहे, या धारणेपोटी त्याला शाकाहारी समाजात, विशेषतः जैन समाजात विशेष स्थान आहे. जैन समाजाच्या या धारणेपोटीच मुंबईत कबुतरखान्यांचा उगम झाला असावा. मुंबईत सध्या ५१ अधिकृत कबुतरखाने आहेत. याशिवाय जैन समाजाची वस्ती जिथेजिथे वाढत जाते, तिथेतिथे या कबुतरखान्यांची संख्याही वाढत जाताना दिसते. अशा अनौपचारिक कबुतरखान्यांची संख्या यापेक्षा अधिक असण्याची



शक्यता आहे. खाण्यास आयतं आणि मुबलक मिळत असल्याने मुंबईतील कबुतरांची संख्या झपाट्याने वाढते आहे. गेल्या तीन वर्षांत ही संख्या दीडशे टक्क्याने वाढल्याने अतिसंख्येचे प्रश्न निर्माण झाले आहेत. विधान परिषदेत पावसाळी अधिवेशनात त्याचीच चर्चा झाली. त्या चर्चेच्या आनुषंगाने मुंबई महानगरपालिकेने कारवाई करायला घेतली. त्याच्या विरोधातून प्रकरण उच्च न्यायालयात गेलं. उच्च न्यायालयाने कारवाईला स्थगिती देण्यास नकार दिला. कबुतरप्रेमी त्यामुळे आक्रमक झाले आणि 'न्यायालयाला झुगारून देण्या'ची, 'प्रसंगी कायदा हातात घेण्या'ची, 'कबुतरांच्या संरक्षणासाठी हिंसा झाली तरी बेहत्तर' अशा आशयाची विधानं सुरू झाली.

भूतदया, प्राणी-पक्षीप्रेम वाईट आहे, असं कोणीही मनुष्यमात्र म्हणणार नाही. तसं कोणत्याच धर्मात नाही. उलट, पुण्यप्राप्तीचा हा सर्वात सोपा मार्ग सर्वत्र मानला जातो. पुण्यप्राप्तीबरोबरच पत्रिकेतील दोष, ग्रहदोष घालवण्यासाठी, किमानपक्षी त्याची तीव्रता कमी करण्यासाठी तरी असे मार्ग अवलंबावेत, असं सांगितलं जातं. पूर्वी केवळ ज्योतिषी, ग्रह गोलार्धाचे तज्ज्ञ म्हणवणारे असं सांगत असत. आता 'यू-ट्युब'वर याचं पेव फुटलं आहे. पक्ष्यांना दाणापाणी, गाईंना (समस्या गंभीर असेल, तर विशिष्ट रंगाच्या!) चारापाणी, कुत्र्या-मांजरांची सेवा, असे नानाविध प्रकार सांगितले जात असल्याने त्यावर हुकूम उपाय करणाऱ्यांची संख्याही अतोनात वाढू लागली आहे. मुंबई किंवा तत्सम शहरांत त्याचे गंभीर दुष्परिणाम दिसू लागले आहेत. माणसांच्या स्थलांतराने शहरांचे व्याप नियंत्रणाबाहेर गेले आहेतच. त्यात प्राणी-पक्षांच्या वाढत्या संख्येने स्वच्छतेचे, नागरी समस्यांचे नवेच प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. सांडपाणी व्यवस्था, स्वच्छतेचा मुळात अभाव आणि त्यात ही नवी भर! अनेकांना याची जाणीव नाही; त्यामुळे, गांभीर्यही नाही. स्थानिक प्रशासनाला या समस्यांना तोंड द्यावं लागत असल्याने नागरी सुव्यवस्थेचा भाग म्हणून त्यांना काही पावलं उचलण्याची निकड भासते आहे. ज्यांना आपलं शहर सुव्यवस्थित, नेटकं असावं असं वाटतं, त्यांनी या यंत्रणांची भूमिकाही समजावून घेतली पाहिजे. कबुतरांचा त्रास नको, म्हणून स्वतःच्या घराला जाळ्या लावणाऱ्यांनी सार्वजनिक उपद्रवाचा विषयही समजून घेतला पाहिजे. कबुतरांची विष्ठा आणि पंखांचा मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांची चर्चा वैद्यकीय भाषेत यापूर्वी झाली आहे. जेव्हां हे प्रमाण अति होतं, त्यावेळी होणारा दुष्परिणामही मोठा असतो. तरीही सरकार आणि न्याय यंत्रणेला तज्ज्ञांकडून अधिकृत आणि नेमका अहवाल आवश्यक वाटला, तर तेही योग्यच म्हणावं लागेल. अशा अहवालांच्या आधारेच शास्त्रीय निर्णय झालेला केव्हांही चांगलाच. तोपर्यंत कबुतरांना खायला घालण्याची जबाबदारी महापालिकेने स्वतः घेतली, हेही योग्यच म्हणता येईल. ज्यांना पुण्यच कमवायचं आहे, त्यांच्यासाठी अन्य अनेक मार्ग उपलब्ध आहेत. वैद्यकीय सुविधांसाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाला येणारे विनंतीअर्ज पाहिले, तर तिकडेही मदतीचा ओघ वाढवता येईल. शिक्षणासाठी गरीब विद्यार्थ्यांना मदत करता येईल. सरकारी प्राणीसंग्रहालयांच्या देणग्यांतही नियमित रक्कम पाठवता येईल. कुणाच्या जीवाशी खेळून कुणाचा जीव वाचवण्याला कुठे समर्थन मिळेल, असं वाटत नाही. आपल्या धार्मिक शिकवणीचा शिकवणुकीचा गाभा लक्षात घेऊन सगळ्यांनीच संयमाने वागावं, हे सर्वोत्तम!!

# कोल्हेवाडीत शहीद जवानांना अभिवादन करून स्वातंत्र्य दिन साजरा



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन देशभरात मोठ्या उत्साहात साजरा होत असताना कोल्हेवाडी गावातही देशभक्तीचा अद्वितीय माहोल अनुभवायला मिळाला. गावातील शूर जवान शरद मोरे यांच्या स्मरणार्थ विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात माजी सैनिक बांधवांनी शहीद जवानांना मानाची वंदना देऊन त्यागमय कार्याला अभिवादन केले.

या उपक्रमाचे आयोजन प्रदेश भाजपा सचिव दत्ताभाऊ कोल्हे आणि मोरे परिवार यांच्या पुढाकाराने करण्यात आले. कार्यक्रमावेळी कोल्हेवाडी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून देशासाठी बलिदान दिलेल्या जवानांना कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात प्रदेश भाजपा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, नामदेव राऊत, अंकित कोल्हे, सोहम कोल्हे, अविनाश पाटील, अविनाश पातेरे, सर्वेश सातव, किरण मोरे, सविता कोंढाळकर, मोहिनी कोल्हे, सरिता मोरे, श्याम मोरे यांच्यासह गावातील मान्यवर उपस्थित होते. माजी सैनिकांच्या पथकाने मोरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली. यावेळी बोलताना दत्ताभाऊ कोल्हे म्हणाले की, "देशासाठी प्राणाची आहुती देणारे जवान हे खरे देवदूत आहेत. जवान शरद मोरे यांचा कोल्हेवाडीत जन्म झाला हे गावाचे भाग्य आहे. देशसेवा हीच ईश्वरसेवा असून प्रत्येक नागरिकाने त्यासाठी कटीबद्ध राहिले पाहिजे. 'हर घर तिरंगा' अभियानाप्रमाणे देशभक्तीची ज्योत प्रत्येक घरात प्रज्वलित व्हावी हीच खरी श्रद्धांजली ठरेल. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने केलेली शौर्यपूर्ण कामगिरी ही निश्चितच अभिमानास्पद आहे. या नेतृत्वाचा सन्मान करणे ही आपली जबाबदारी आहे." या कार्यक्रमात उपस्थित नागरिकांना पेढे वाटून देशसेवेचा जागर करण्यात आला. तसेच दत्ताभाऊ कोल्हे यांनी उपस्थितांना आवाहन केले की, देशाच्या प्रगतीत सहभागी होणे, पर्यावरणाचे रक्षण करणे, स्वच्छतेला प्राधान्य देणे आणि समाजकार्यासाठी सक्रिय राहणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. या कार्यक्रमात कोल्हेवाडी परिसरातील नागरिक, महिला मंडळे, तरुण कार्यकर्ते, ग्रामस्थ तसेच माजी सैनिक बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. संपूर्ण परिसर देशभक्तीच्या घोषणांनी दुमदुमून गेला.

# हिरा एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत स्वातंत्र्य दिन साजरा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिरा एज्युकेशन सोसायटी संचलित किंडर गार्डन इंग्लिश मीडियम स्कूल येथे 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचा सोहळा मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात पार पडला. संपूर्ण शाळा परिसर तिरंग्याच्या सजावटीने उजळून निघाला होता.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल दूधभाते (संचालक, आदित्य फाउंडेशन व दूधभाते नेत्रालय), श्री प्रवीण शिंदे (संचालक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक), श्री अनिल मते (जिल्हा उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी), रमेश बाप्पू गायकवाड (उपाध्यक्ष, ओबीसी मोर्चा – पुणे शहर), अजय मते (सरचिटणीस, खडकवासला) तसेच सौ. पुष्पलता ढमढेरे उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा सोहळा पार पडला. राष्ट्रगीताच्या सुरावटींनी वातावरण भारावून गेले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, मनोगते, भाषणे व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.

संस्थेचे संचालक श्री अभय खंदरकर व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सोनाली खंदरकर यांनी पाहुण्यांचे स्वागत करून आभार मानले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या कला-सादरीकरणाचे कौतुक करत त्यांना देशभक्ती व सामाजिक बांधिलकी जपण्याचे मार्गदर्शन केले. या सोहळ्याला पालक, विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. देशप्रेम, एकात्मता व अभिमानाच्या भावना व्यक्त करणाऱ्या या कार्यक्रमाने शाळेचा परिसर रंगतदार व देशभक्तीमय झाला.

## जीवन विम्याबाबत मोठी जागरूकता आणि उद्दिष्टावर आधारित आर्थिक नियोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेड ("ॲक्सिस मॅक्स लाईफ" /"कंपनी") पूर्वाश्रमी मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड म्हणून ओळखले जाणाऱ्या कंपनीने जगातील आघाडीच्या मार्केटिंग डेटा आणि ॲनालिटिक्स कंपनी कंटार यांच्या भागीदारीत केलेल्या त्यांच्या प्रमुख सर्वेक्षण - इंडिया प्रोटेक्शन कोशंट (आयपीक्यू) च्या सातव्या आवृत्तीतील पश्चिम विभागातील निष्कर्षांचे अनावरण केले आहे. पश्चिम विभागातील निष्कर्षांमधून मुदत विम्याबाबत वाढती जागरूकता आणि दीर्घकालीन आर्थिक नियोजनासाठी जीवन विम्याचा वापर करण्याच्या वाढत्या हेतूमुळे संरक्षणाच्या भावनेत सातत्याने सुधारणा होत असल्याचे दिसून येते. ॲक्सिस मॅक्स लाईफ 'भरोसा टॉक्स' च्या एकत्रित कथेअंतर्गत इंडिया प्रोटेक्शन कोशंट ७.० आणत आहे. त्यातून भारताच्या विकसित होत असलेल्या आर्थिक आणि संरक्षण मानसिकतेवर प्रकाश टाकला जाईल. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ॲक्सिस मॅक्स लाईफचे उद्दिष्ट शहरी, ग्रामीण, पगारदार, गिग कामगार आणि निवृत्त लोकसंख्येचा विचार करण्याचे आहे.

## सिग्नेचर ग्लोबलच्या शेअरमध्ये ६० टक्क्यांपर्यंत वाढीची शक्यता


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडने केलेल्या दमदार कामगिरीनंतर ॲक्सिस कॅपिटल, आयसीआयसीआय सिक्युरिटीज आणि मोतीलाल ओसवाल या ब्रोकरेज फर्मनी कंपनीचे शेअर विकत घेण्याची शिफारस केली आहे. ॲक्सिस कॅपिटलने १,७८० रुपयांच्या लक्ष्यित किंमतीसह बाय (खरेदी करा) ही रेटिंग कायम ठेवली आहे, तर मोतीलाल ओसवाल आणि आयसीआयसीआय सिक्युरिटीजने

SIGNATURE GLOBAL®
REALTY. RELIABILITY. RESPONSIBILITY.
AN ISO 9001:2015; 14001:2015; 45001:2018; 27001:2022; 31000:2018 CERTIFIED

अनुक्रमे १,७६० आणि १,७४२ रुपयांच्या लक्षित किमती निश्चित केल्या आहेत. त्यामुळे समभागांच्या किमतीमध्ये ६० टक्क्यांपर्यंत वाढ सूचित होत आहे. सिग्नेचर ग्लोबलच्या शेअरची किंमत ११ ऑगस्ट २०२५ रोजी सुरूवातीच्या सौद्यांच्या वेळेस १,१४७.८० रुपयांवरून सुरू झाली.

# धानेप जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप




**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने धानेप ता वेल्हे येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन माजी जिल्हा परिषद सदस्य अमोल नलावडे व राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष किरणभाऊ राऊत यांच्या पुढाकाराने करण्यात आले. भोर-वेल्हा-मुळशीचे आमदार शंकरभाऊ मांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि धानेप ग्रामपंचायत सरपंच राहुल मळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. कार्यक्रमाला धानेप शाळेचे मुख्याध्यापक मोहन धरफाळे, ग्रामसेवक आय. एन. उमदे, तसेच नागरिकांमधून प्रतापराव मरळ, किरण धिंडले, मारुती गोविलकर, श्रीपती रेणूसे, चंद्रकांत मरळ, रामभाऊ खुटेकर, प्रभाकर मळेकर, नामदेव धिंडले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करताना "समाजासाठी काहीतरी देणे लागते" ही भावना प्रत्येकाने जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन केले. बॅग वाटप झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता, तर पालक व नागरिकांनी समाधान व्यक्त केले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उत्साह वाढतो, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# थोडक्यात



## नवले शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात

**पुणे (खडकवासला) (आरंभ पर्व) :** भारतीय स्वातंत्र्याचा ७९ वा स्वतंत्र दिन नारायणराव नवले प्राथमिक विद्यालय मनपा शाळा क्र. २०४ बी व ५६ बी येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर गीतांनी झाली. तालबद्ध कवायत आणि लेझीमच्या वादनाने उपस्थित मान्यवर व पालकांची मने जिंकली. ध्वजारोहण माजी नगरसेवक मा. राजाभाऊ लायगुडे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी माजी स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे, खडकवासला भाजपा मंडल अध्यक्ष यशवंतबापू लायगुडे, युवा मोर्चा पदाधिकारी सारंग दादा नवले आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वक्त्यांनी राष्ट्रभक्ती, प्रामाणिकपणा आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. यश भोसले या लहान विद्यार्थ्याच्या प्रभावी भाषणाने वातावरणात नवचैतन्य निर्माण झाले. सदर कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता मानकर, सौ. सुमन गंथडे, सौ. स्वाती पडवळ, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. रेखा साखरे, सर्व शिक्षकवृंद, सेवक, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सारंग नवले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "देशाविषयी राष्ट्रभक्ती बाळगणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. विद्यार्थी हे भविष्यातील नागरिक असून त्यांनी याचा नक्की बोध घ्यावा." माजी नगरसेवक गंगाधर भडावळे यांनीही विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त डास प्रतिबंधक औषध फवारणी मोहिमेचा शुभारंभ



**वडगाव बुद्रुक(आरंभ पर्व) :** धायरी प्रभागात स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नगरसेवक हरिदास चरवड यांच्या मार्गदर्शनाखाली डास प्रतिबंधक औषध फवारणी मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.दरवर्षीप्रमाणे यंदाही या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांपासून संरक्षण मिळणार असून स्वच्छ व निरोगी वातावरण निर्माण होणार आहे. नगरसेवक चरवड यांनी यावेळी सांगितले की, "परिसरातील प्रत्येकाने स्वच्छतेबाबत जागरूक राहणे गरजेचे आहे. नागरिकांच्या आरोग्य रक्षणासाठी अशी मोहीम सातत्याने राबवली जाणार आहे." या मोहिमेच्या शुभारंभप्रसंगी सुहास पवार, चंद्रकांत पवळे, मिलिंद गायकवाड, संग्राम पवार, केदार जाधव, आकाश लोणारे, सिद्धार्थ कांबळे, कमलेश गायकवाड , नंदकिशोर गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करून मा. नगरसेवक हरिदास चरवड यांचे आभार मानले.

# ११ हजार भाविकांना महाप्रसाद देत धायरीत मनसेची आगळी-वेगळी दहीहंडी साजरी

## मनसे नेते शिवाजीराव मते व सोनाली ताई पोकळे यांचे उत्कृष्ट नियोजन : सर्वपक्षीय नेत्यांनी मनसेच्या महाप्रसादास लावली हजेरी




**धायरी (दै. आरंभ पर्व)**

गोकुळाष्टमीच्या शुभप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेना, खडकवासला मतदारसंघाच्या वतीने दहीहंडी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी तब्बल अकरा हजारांहून अधिक भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करून आगळीवेगळी दहीहंडी साजरी करण्यात आली.

श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करून अध्याय सोहळ्याला प्रारंभ झाला. पुणे शहर अध्यक्ष साईनाथ बाबर यांनी प्रतिकृती पूजन व आरती करून कार्यक्रमाची सुरुवात केली.



ढोल-ताशांच्या गजरात पारंपारिक पद्धतीने दहीहंडीचा उत्सव पार पडला.

या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून ॲड. राजेश मुंडे, मनसे विद्यार्थी सेना शहराध्यक्ष महेश भोईभार, माजी नगरसेवक हरिदास चरवड, भाजप नेते दत्तात्रय कोल्हे, यशवंतबापू लायगुडे ,दीपक चव्हाण, खडकवासला मनसे अध्यक्ष विजय मते, संतोष पोकळे, सारंग नवले, अतुल चाकणकर, सचिन चव्हाण, संदीप पोकळे यांच्यासह मनसे खडकवासला मतदारसंघातील सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या महाप्रसादा उपक्रमाचे आयोजन वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मते , पुणे मनसेच्या सरचिटणीस सोनालीताई पोकळे व धायरी मनसे यांनी केले होते.

> **महाराष्ट्र नवनिर्माण सेना ही नेहमीच जनतेच्या सेवेला प्राधान्य देते. हा आदर्श शिवाजी राव मते व सोनाली ताई पोकळे व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घालून दिला आहे. आगामी काळातील त्यांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत.**
>
> **- साईनाथ भाऊ बाबर, शहराध्यक्ष मनसे.**

# धायरीत खंडोबा मंदिर परिसरात भव्य वृक्षारोपण उपक्रम

## नांदेड पोलीस स्टेशन व बापूसाहेब पोकळे यांच्या सौजन्याने भव्य वृक्षारोपण






**धायरी (दै. आरंभ पर्व)**
स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनासाठी नांदेड सिटी पोलीस स्टेशन, रोटरी क्लब पुणे आणि खंडोबा देवस्थान मल्हारगड, धायरी यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आणि "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश देत या उपक्रमात २०० हून अधिक झाडांची लागवड करण्यात आली.

धायरीतील खंडोबा मंदिर परिसरातील फॉरेस्ट भागात पार पडलेल्या या वृक्षारोपणात चिंच, आवळा, पिंपळ यांसारख्या उपयुक्त झाडांचा समावेश होता.

पोलीस निरीक्षक अतुल भोस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि खडकवासला मतदारसंघाचे भाजप सरचिटणीस मा. बापूसाहेब पोकळे यांच्या सौजन्याने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

यावेळी पोलीस निरीक्षक अतुल बोस यांनी खडकवासला व परिसरात २,००० झाडे लावण्याचा संकल्प जाहीर केला. सर्व मंडळांनी नागरिकांनी वृक्ष लागवडीसाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमात पोलिस निरीक्षक अतुल बोस, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, पोलीस उपनिरीक्षक स्वप्नाली गायकवाड, गणेश कसबे, तसेच रोटरी क्लब सदस्य, खंडोबा मंदिर ट्रस्टचे सेवेकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. नेताजी बाबर, सोमनाथ रायकर, दीपक रायकर, राहुल तुकाराम पोकळे, बापूशेठ पोकळे, सागर पोकळे, कुणाल पोकळे यांचा विशेष सहभाग होता.

या वृक्षारोपण उपक्रमामुळे परिसरातील हरिताई वाढेल, पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### वृक्ष लागवड उपक्रमासाठी कटिबद्ध

"जीवनासाठी ऑक्सिजन अत्यावश्यक आहे आणि तो निर्माण करण्याचे कार्य झाडे करतात. त्यामुळे प्रत्येकाने झाडे लावणे व त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. दरवर्षी वृक्षारोपण मोहिमेत माझे सहकार्य निश्चित राहील. - बापूसाहेब पोकळे, सरचिटणीस, भाजपा

## थोडक्यात



### टॅमरिंड पार्क येथे स्वातंत्र्य दिन साजरा

धायरी (आरंभ पर्व) : धायरीतील टॅमरिंड पार्क सोसायटीमध्ये स्वातंत्र्य दिनाचा जल्लोष मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी ध्वजारोहण सोसायटीतील सर्व चेअरमन, फ्लॅट धारक सदस्य, माता-भगिनी, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी खडकवासला भाजपाचे सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी देशप्रेम, जनजागृती आणि राष्ट्रीय ऐक्याचे महत्व अधोरेखित केले. "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या सर्वांगीण विकासाला गती दिली असून, प्रत्येक नागरिकाने देशाच्या प्रगतीत हातभार लावावा," असे आवाहन त्यांनी केले. ध्वजगीत, देशभक्तीपर गीते, मुलांचे सांस्कृतिक सादरीकरण आणि मान्यवरांचे मनोगत यामुळे वातावरण देशभक्तीने भारले. संपूर्ण सोसायटीने एकत्र येऊन स्वातंत्र्य दिनाचा आनंद साजरा करत "एक देश – एक कुटुंब" हा संदेश दिला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला आणि सोहळा आनंदात संपन्न झाला.

### श्रुती शिंदे हिची पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी



पुणे (आरंभ पर्व) : वडगावशेरी येथील राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषीजी महाराज प्राथमिक विद्यालय (पुणे महानगरपालिका) ची विद्यार्थिनी कुमारी श्रुती शंकर शिंदे हिने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) मध्ये उत्कृष्ट यश संपादन केले आहे.


## उपविभागीय दंडाधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय

७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवनमागे, पुणे - ४११००१
दुरध्वनी क्र.-०२०-२६३३०८३२ Email-sdopune@gmail.com

क्र. मृत्यू/एसआर/६५/२०२४

१) श्री. मनोज विठ्ठल करंजावणे,
रा. खांमगाव मावळ, ता. हवेली, जि. पुणे — अर्जदार
विरुध्द
२) जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी / निबंधक,
ग्रामपंचायत खांमगाव मावळ, ता. हवेली, जि. पुणे — जाबदेणार

विषय : जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. मनोज विठ्ठल करंजावणे, रा. खांमगाव मावळ, ता. हवेली, जि. पुणे (अपिलार्थी) यांनी त्यांचे आई कै. गीता विठ्ठल करंजावणे, यांचा, मृत्यु दि.१६/०३/२००७ रोजी मौजे खांमगाव मावळ, ता. हवेली, जि. पुणे येथे झाला आहे. सदर मृत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्युची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. ११ /०८/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण- पुणे
दिनांक:- ११/०६/२०२५

शिक्का

सही/-
(डॉ. यशवंत माने)
उपविभागीय दंडाधिकारी, हवेली
उपविभाग पुणे




## स्पोर्ट्स, कल्चर अँड सोशल फाऊंडेशन सोसायटीची स्थापना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
आनंदनगर, सिंहगड रोड येथे आज स्पोर्ट्स, कल्चर अँड सोशल फाऊंडेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली.

या बैठकीस २० हून अधिक समाजसेवक उपस्थित होते. बैठकीचे अध्यक्षस्थान निवृत्त पोलिस अधिकारी श्री. शेवाळे यांनी भूषविले.

बैठकीस उपस्थित मान्यवरांमध्ये –श्री. शेवाळे (निवृत्त पोलिस अधिकारी), श्री. कुलकर्णी (निवृत्त पोलीस उपनिरीक्षक), श्री. पांचवाघ (निवृत्त अधीक्षक, महाराष्ट्र राज्य परिवहन), अप्पा कुलकर्णी (समाजसेवक), श्रीराम वेलापूरे (बँक व्यवस्थापक), श्री. मेहता (निवृत्त सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी), श्री. प्रभू (निवृत्त बँक अधिकारी), श्री. कुलकर्णी (समाजसेवक), एकपात्री कलाकार प्रायग, श्री. दिवाकर, श्री. केदारी (कुस्ती प्रशिक्षक), श्री. खाडे (अध्यक्ष – ज्ञानपीठ करिअर अकॅडमी), डॉ. वेंकटेश वांगवड तसेच मोठ्या संख्येने मॉर्निंग वॉकर यांचा समावेश होता. या सोसायटीच्या स्थापनेमुळे आनंदनगर व परिसरात क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्याला नवे बळ मिळणार असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

### स्वप्नपूर्ती महिला फाउंडेशन तर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त

## महिलांसाठी विविध कौशल्य प्रशिक्षण उपक्रम





**धायरी (दै. आरंभ पर्व)**
नऱ्हे परिसरातील स्वप्नपूर्ती महिला फाउंडेशनच्या वतीने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये गौराई सजावट, रांगोळी डिझाइन तसेच इतर अनेक कौशल्यवर्धक उपक्रमांचे प्रशिक्षण महिलांना देण्यात आले. त्याचबरोबर आधारकार्ड कॅम्पचे आयोजन करून नागरिकांना सोयीसुविधा पुरविण्यात आल्या. या कार्यक्रमास परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. नेहा भूपेंद्र मोरे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. आगामी काळात महिलांसाठी आणखी उपक्रम राबविणार असल्याचे त्या प्रसंगी त्यांनी सांगितले. महिलांसाठी सातत्याने उपक्रम राबविल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या कार्याचे विशेष कौतुक उपस्थित महिलांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी सौ. सोनाली नायर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाप्रसंगी स्वप्नपूर्ती महिला फाउंडेशनच्या अध्यक्ष सौ. नेहा भूपेंद्र मोरे, सौ. अंजली भूषण मोरे, सौ. यशस्वी हरीश वैद्य, सौ. सुजाता सतीश वैद्य, सौ. रक्षा हुशारे (डिझायनर), सौ. नम्रता थोपटे, सौ. चित्रा देशमुख, कुमारी निकिता मांढरे, सौ. आशा मिंदे, सौ. रेखा घोगरे, सौ. मोनाली भरत शहा, सौ. सुजाता निंबाळकर, सौ. रुपाली निंबाळकर आदी मान्यवर महिला उपस्थित होत्या.

## खासदारांच्या अटकेविरोधात काँग्रेसतर्फे जोरदार निषेध आंदोलन




**धायरी (दै. आरंभ पर्व)**
वडगाव ब्रिज येथे खडकवासला काँग्रेस कमिटीच्या वतीने भव्य व तीव्र निषेध आंदोलन पार पडले. केंद्रीय निवडणूक आयोगामार्फत होत असल्याचा आरोप असलेल्या वोट चोरी प्रकरणाचा आणि काँग्रेसचे नेते माननीय राहुल गांधी यांच्यासह तब्बल 300 खासदारांना अटक करण्यात आल्याचा निषेध या आंदोलनातून करण्यात आला. काँग्रेस नेत्यांनी आंदोलनादरम्यान लोकशाहीच्या मूल्यांवर होत असलेल्या हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. सध्याच्या सत्ताधाऱ्यांकडून निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करून मतदारांचा विश्वास तोडला जात आहे. तसेच, विरोधी पक्षांचे आवाज दाबण्यासाठी राजकीय नेत्यांना विनाकारण अटक केली जात आहे. असा आरोप या आंदोलनातून खडकवासला काँग्रेसने केला आहे. या आंदोलनात मा.श्रीरंग चव्हाण पाटील (सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी), मा. श्रीकृष्ण बराटे (सदस्य, महाराष्ट्र काँग्रेस कमिटी), मा. लहूआण्णा निवंगूने (खजिनदार, जिल्हा काँग्रेस), मा. सचिन बराटे (अध्यक्ष, हवेली तालुका काँग्रेस), मा. अवधूत मते (उपाध्यक्ष, पुणे जिल्हा काँग्रेस), मा. अर्चनाताई शहा (सरचिटणीस, जिल्हा काँग्रेस), विश्वाजीत जाधव (अध्यक्ष, खडकवासला युवक काँग्रेस) यांच्यासह धनंजय पाटिल, आप्पा खुडे, अतुल कारले, विजय लगड, मिलिंद पोकळे, सुरेश मते, विशाल पवार, शंकरराव दांगट यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. आंदोलनादरम्यान घोषणाबाजीने परिसर दुमदुमून गेला. "लोकशाही वाचवा", "वोट चोरी बंद करा", "राहुल गांधी पुढे चला, आम्ही तुमच्यासोबत आहोत" अशा घोषणांनी वातावरण पेटले. हातात निषेध फलक, तिरंगे आणि काँग्रेसचे झेंडे घेऊन कार्यकर्त्यांनी एकजुटीचा संदेश दिला.

यावेळी बोलताना काँग्रेसचे नेते श्रीरंग चव्हाण म्हणाले की, काँग्रेस पक्ष लोकशाही व संविधान वाचविण्यासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढा देणार आहे. निवडणुकीतील पारदर्शकता, निष्पक्षता आणि जनतेचा विश्वास परत मिळवण्यासाठी संपूर्ण देशात अशा प्रकारचे आंदोलन सुरू राहील. एकमुखाने लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी लढा सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी सर्व काँग्रेसच्या नेते व कार्यकर्त्यांनी केला व्यक्त केला.

## सिग्नेचर ग्लोबलच्या शेअरमध्ये ६० टक्क्यांपर्यंत वाढीची शक्यता



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडने केलेल्या दमदार कामगिरीनंतर ॲक्सिस कॅपिटल, आयसीआयसीआय सिक्युरिटीज आणि मोतीलाल ओसवाल या ब्रोकरेज फर्मनी कंपनीचे शेअर विकत घेण्याची शिफारस केली आहे. ॲक्सिस कॅपिटलने १,७८० रुपयांच्या लक्षित किंमतीसह बाय (खरेदी करा) ही रेटिंग कायम ठेवली आहे, तर मोतीलाल ओसवाल आणि आयसीआयसीआय सिक्युरिटीजने अनुक्रमे १,७६० आणि १,७४२ रुपयांच्या लक्षित किमती निश्चित केल्या आहेत. त्यामुळे समभागांच्या किमतीमध्ये ६० टक्क्यांपर्यंत वाढ सूचित होत आहे. सिग्नेचर ग्लोबलच्या शेअरची किंमत ११ ऑगस्ट २०२५ रोजी सुरूवातीच्या सौद्यांच्या वेळेस १,१४७.८० रुपयांवरून सुरू झाली. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये कंपनीचा महसूल वार्षिक आधारावर दुपटीने वाढून ८७० कोटी रुपयांवर पोहोचला. त्यामागे कंपनीने केलेली १४ लाख चौ. फुटांची डिलिव्हरी तर करोत्तर नफा पाचपटीने वाढून ३४.४ कोटी रुपयांवर पोहोचण्याची चालना होती.

## सारोळे ग्रामपंचायत कार्यालय येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

### शरदचंद्रजी पवार प्रशालेच्या दहीहंडीने लक्ष वेधले : देशसेवा केलेल्या माजी सैनिकांचा व गुणवंत व माजी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न





**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**
बार्शी तालुक्यातील सारोळे येथे स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालय परिसरात झालेल्या या कार्यक्रमास ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामपंचायत सारोळे, शरदचंद्रजी पवार प्रशाला व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळी ध्वजारोहण दिलीपतात्या गाटे व भारतभाऊ गाटे यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांची मनोगते, अंगणवाडी मुलांचे नृत्य, जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची सांस्कृतिक सादरीकरणे यामुळे वातावरण देशभक्तीमय झाले. माजी विद्यार्थी तसेच देशसेवेसाठी योगदान दिलेल्या माजी सैनिकांचा सत्कार करून त्यांना गौरविण्यात आले. शरदचंद्रजी पवार प्रशालेच्या विद्यार्थ्यांची दहीहंडी व संगीत कवायत विशेष आकर्षण ठरले.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद सामाजिक कार्यकर्ते बालाजी भाऊ निचळ यांनी भूषवले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य विलासदादा गाटे, माजी सरपंच बाळराजे गाटे, सरपंच सौ. सुवर्णा काकडे, उपसरपंच जितेंद्र चौधरी, माजी सैनिक राजकुमार जाधव, अमित भोसले, विजयकुमार जाधव, मुख्याध्यापक धनाजी तिकटे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भास्कर पालकर, सर्व ग्रामपंचायत सदस्य , ग्रामसेवक व तलाठी, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वनाथ साबळे सर यांनी केले. अनेक वर्षांनंतर ग्रामस्थांच्या मोठ्या उपस्थितीत झालेला हा कार्यक्रम ग्रामस्थांसाठी ऐतिहासिक ठरला. यावेळी माजी सरपंच बाळराजे गाटे यांनी आगामी काळात विकासकामांचा वेग कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. अत्यंत मधुरमय या कार्यक्रमावर उपस्थित सर्वांची कौतुकाची थाप पडली.




## थोडक्यात



### खडकवासला भाजप ग्रामीणतर्फे भव्य तिरंगा रॅली देशभक्तीचा जल्लोष

खडकवासला (आरंभ पर्व) : स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला खडकवासला भाजप ग्रामीणतर्फे भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीतून "देशासाठी प्रत्येकाने काहीतरी योगदान द्यावे" हा संदेश देत राष्ट्रभक्तीचा उत्साह उंचावला. ही रॅली पुणे ग्रामीण अध्यक्ष शेखर वडणे आणि खडकवासला आमदार भीमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कार्यक्रमाचे संयोजन खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे, युवा मोर्चा अध्यक्ष लालाभाऊ जावळकर यांनी केले. खानापूर (ता. हवेली) येथे झालेल्या या रॅलीत शेकडो कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. तिरंग्याच्या रंगात न्हालेल्या मोटारसायकली, जोशपूर्ण घोषणाबाजी आणि देशभक्तीपर गीते यामुळे संपूर्ण परिसर देशप्रेमाने दुमदुमला. या रॅलीस पुणे जिल्हा दिव्यांग विकास आघाडी अध्यक्ष बाजीराव पारगे, दत्ताभाऊ पायगुडे, लालाशेठ जवळकर, नवनाथ मकर, अभिजीत कांबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच सचिन पायगुडे (पुणे जिल्हा उपाध्यक्ष), जानवी बोरसे (महिला मोर्चा उपाध्यक्ष, पुणे जिल्हा), सुनील भाऊ जागडे (पुणे जिल्हा सरचिटणीस), दिपक रजपूत (उपाध्यक्ष, पुणे जिल्हा), किरण तागुंदे, समीर कानगुडे, सुनिल मांढरे, शिवाजी लायगुडे, महिला अध्यक्ष संतोषी दारवटकर, परशुराम तागुंदे (युवा मोर्चा, पुणे जिल्हा), राजाराम माताळे, नंदुशेठ जावळकर, दत्ताभाऊ दबडे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला. अखेर नवनाथ तागुंदे यांनी सर्व मान्यवर व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानत पुढील काळात अशाच राष्ट्रप्रेम जागवणाऱ्या उपक्रमांत सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागाचे आवाहन केले.

### 'मलबार गोल्ड अँड डायमंड्स'ने सादर केली 'नुआ' कलेक्शन



पुणे (आरंभ पर्व) : जगातील सहाव्या क्रमांकाचे सर्वांत मोठे किरकोळ दागिने विक्रेते 'मलबार गोल्ड अँड डायमंड्स'ने पंचतारांकित हॉटेल हयात पुणे येथे त्यांच्या नवीन नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांच्या श्रेणी 'नुवा बाय माइन डायमंड्स' या एका विशेष (फक्त आमंत्रितांसाठी) प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन केले. निवडक ग्राहकांसाठी 'नुआ, प्रबळतेने चमका' नावाचा हा कार्यक्रम घेण्यात आला, जो धाडसी स्त्रीत्व आणि आधुनिक कारागिरीचा उत्सव ठरला. डिझाइनच्या उत्कृष्टतेबरोबरच, नुआ कलेक्शनने प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री आणि ब्रँड ॲम्बेसिडर करीना कपूर-खान यांच्या शैलीयुक्त मोहिमांद्वारेही ग्राहकांमध्ये आपला खास प्रभाव पाडला आहे. मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळीने 'सेलिब्रिटी शोस्टॉपर' म्हणून रॅम्प वॉक करताना उपस्थित सर्वांचे या वेळी लक्ष वेधून घेतले. तिने नुआचे आकर्षक दागिने परिधान केले होते. त्याचबरोबर फॅशन स्टायलिस्ट आयुषी गालाने डिझाइन केलेले 'पानीहारी'चे खास डिझाइन केलेला पोशाख तिच्या सौंदर्यात अधिक भर घालत होता. प्राजक्ता माळीच्या बहारदार सादरीकरणाने व्यावसायिक मॉडेल्ससह, सायंकाळच्या मोहकतेत अधिक भर घातली. तसेच बहुमुखी प्रतिभा, व्यक्तिमत्व आणि आधुनिक आकर्षण ही 'नुआ'च्या संग्रहाची खरी ओळख या वेळी खऱ्या अर्थाने जिवंत झाली. आयुषी गालाच्या उत्कृष्ट स्टाइलिंगसह, हा कार्यक्रम 'नुआ'च्या लक्झरी, आधुनिकता आणि भव्यता आदी भावनांचे प्रतिबिंब होता.पनीहारीच्या आधुनिक स्टाईलचा सिल्हूट पोशाख नुआच्या अत्याधुनिक गर्द दागिन्यांच्या डिझाइनशी पूर्णपणे जुळत होता, ज्यामुळे फॅशन आणि उत्तम दागिन्यांचा एक अनोखा मिलाफ पहावयास मिळाला.

# धायरी–शिवणे मंडलाच्या तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांच्या संकल्पनेतून भव्य आयोजन

**धायरी, खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

स्वातंत्र्य दिनानिमित्त खडकवासला मतदारसंघातील धायरी–शिवणे मंडळाच्या वतीने, मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांच्या पुढाकाराने व संकल्पनेतून भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. देशाविषयीची निष्ठा दृढ करण्यासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'हर घर तिरंगा' अभियानाला चालना देण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

देशभर सुरू असलेल्या तिरंगा रॅलीच्या उपक्रमाचा भाग म्हणून ही रॅली आमदार भीमराव तापकीर व शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. रॅलीत सहभागी होताना नागरिकांच्या



चेहऱ्यावर देशभक्तीचा उत्साह आणि अभिमान स्पष्ट दिसत होता. हातात तिरंगा, गगनभेदी घोषणा आणि देशभक्तीची गाणी यामुळे वातावरण भारावून गेले होते.

या रॅलीत स्वीकृत नगरसेवक सचिन दांगट, प्रदेश ओबीसी सचिव दत्ताभाऊ कोल्हे, सरचिटणीस बापूसाहेब पोकळे, सामाजिक कार्यकर्ते किशोरभाऊ पोकळे, किसान आघाडीचे अरुण दांगट, संदीपभाऊ पोकळे, सुभाष नाणेकर, किरण हगवणे, गणेश वांजळे, स्वप्नील साळवी, अभिषेक कांबळे, अनिल मते, खडकवासला महिला आघाडीच्या अध्यक्षा रश्मी घुले पाटील, धनश्री कोल्हे, सुप्रिया करमरकर, अजित कारले, सुजित कारले, सायली भोसले, रोहिणी राहणे, काजल हगवणे, तेजस्वीनी शिरोडकर, निशा जाधव, काशिनाथ पोकळे, महेश बजाज, गिरीश वसेकर, अभिजित धावडे, निखिल दांगट यांच्यासह विविध मान्यवर, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

रॅलीची सुरुवात धायरीतील धारेश्वर मंदिरापासून झाली. तेथून किरकटवाडी–कोल्हेवाडी मार्गे नांदेड सिटी, उत्तम नगर, शिवणे आणि कारले चौक स्मारक येथे समारोप झाला. रॅलीदरम्यान "भारत माता की जय", "वंदे मातरम्", "जय हिंद" अशा घोषणा देण्यात आल्या. मार्गात अनेक ठिकाणी नागरिकांनी रॅलीचे स्वागत केले, फुलांचा वर्षाव केला आणि राष्ट्रध्वज फडकवून उत्साह व्यक्त केला.

समारोप कार्यक्रमात मंडळाध्यक्ष रुपेश घुले पाटील म्हणाले, "स्वातंत्र्य दिन हा सर्वांचा राष्ट्रीय सण आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांचा आणि आजही सीमेवर पहारा देणाऱ्या जवानांचा आपण सन्मान करायला हवा. या रॅलीतून आपण सर्वांनी देशभक्तीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवला आहे. उपस्थित सर्व मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांचे मनःपूर्वक आभार."

रॅली यशस्वी करण्यासाठी मंडळातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. संपूर्ण वातावरणात देशभक्तीचा जोश आणि एकतेचा संदेश झळकला. अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने ही रॅली यशस्वीरीत्या पार पडली.

## एसआयपी ॲकॅडमीचा २२ वर्षे पूर्तीचा आनंदोत्सव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बालकांच्या कौशल्य विकास क्षेत्रातील भारतातील दिग्गज कंपनी एसआयपी ॲकॅडमीने कामकाजाची २२ वर्षे पूर्ण करून आणि देशभरात १२५० हून अधिक फ्रँचायझी केंद्रांचा विस्तार करून नुकताच एक मोठा टप्पा पार केला. त्यामुळे ती भारतातील सर्वात मोठ्या शालेय शिक्षण नेटवर्कपैकी एक बनली आहे. एसआयपी ॲबॅकस, ग्लोबलआर्ट, मायकिड्स आणि क्रिको इंग्लिश यांसारखे प्रमुख कार्यक्रम राबविणाऱ्या या ॲकॅडमीने जीआरटी हॉटेल्सच्या ग्रँड चेन्नई येथे भव्य प्रमाणात हा वर्धापनदिन साजरा केला. या कार्यक्रमात शीर्ष फ्रँचायझी, माजी विद्यार्थी, शिक्षक आणि भागीदार सहभागी झाले होते. भारतातील १४ लाखांहून अधिक मुलांवर प्रभाव पाडणाऱ्या प्रवासाचा हे सर्व जण भाग आहेत. या उत्सवात एसआयपी ॲकॅडमीने शिक्षण, उत्साह आणि पर्यावरणीय कृती यांचा मिलाफ साधणारे तीन मोठे उपक्रम यावेळी जाहीर केले. यामध्ये इस्रोच्या रॉकेट प्रक्षेपणाचा भव्य पुरस्कार असलेली राष्ट्रीय स्तरावरील गणित स्पर्धा हा प्रमुख उपक्रम आहे. एसआयपीची प्रमुख अंकगणितीय जीनियस स्पर्धा (ॲरिथमेटिक जीनियस कॉन्टेस्ट -एजीसी) ची १० वी आवृत्ती ही केवळ एक स्पर्धा नाही. ती भारताच्या भविष्याचे एक अग्रस्थान आहे.

## दशक्रिया घाटासाठी पारगे कुटुंबीयांकडून १४ गुंठे जमीन दान

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

गावाच्या प्रगतीसाठी आणि जनतेच्या सोयीसाठी खऱ्या अर्थाने सेवा करण्याची भावना असलेला नेता कोण असतो, याचे उत्तम उदाहरण डोणजे गावात पाहायला मिळाले. माजी सरपंच स्व. रोहिदास पारगे यांच्या द्वितीय स्मरणार्थ त्यांच्या सुपुत्राने — माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे यांनी — डोंजे गावातील ग्रामस्थांच्या सोयीसाठी दशक्रिया विधी साठी १४ गुंठे जमीन गावकऱ्यांच्या सेवेसाठी ग्रामपंचायतकडे हस्तांतरित केली.

नवनाथदादा पारगे यांनी आपल्या वडिलांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत ही जमीन दान केली.स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ग्रामपंचायत कार्यालयात या



जमिनीचे दानपत्र अधिकृतपणे सुपूर्द करण्यात आले.

यावेळी माजी जि.प. सदस्य नवनाथदादा पारगे, सौ. पूजाताई पारगे, सौ. सायली चव्हाण (सरपंच, डोणजे), श्री. शेखर पारगे (उपसरपंच, डोणजे), श्री. सतिश चव्हाण (ग्रामविकास अधिकारी, डोणजे), श्री. मारुती कंक (सदस्य, ग्रा. पं. डोणजे), श्री. सौरभ कांबळे (सदस्य, ग्रा. पं. डोणजे), कु. रोहिणी कुंभार, सौ. सारिका भगत तसेच गावातील अनेक मान्यवर, सरपंच, ग्रामसेवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावातील नागरिकांनी या कार्याचे मनापासून स्वागत करताना व्यक्त केले की, स्व. रोहिदास पारगे यांनी ज्या जनसेवेचा वारसा निर्माण केला होता, तोच वारसा आज नवनाथ पारगे यांनी कायम ठेवला आहे.

त्यांच्या या दानकार्यामुळे केवळ एका जागेची सोय झाली नाही, तर गावात एकतेची आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक बळकट झाली आहे.

असे नेते सर्वत्र घडायला हवेत अशीच भावना नागरिकांची व्यक्त होत आहे. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, सर्वत्र "नेता असावा तर असा!" असा घोष घुमत आहे. जनतेच्या गरजा ओळखून, त्या निस्वार्थीपणे पूर्ण करणारे असे लोकप्रतिनिधी गावाच्या विकासात मोलाची भूमिका बजावतात, हे डोणजे गावाने पुन्हा एकदा अनुभवले आहे.

## श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर श्रावणी गुरुवारी महाप्रसाद

- **ॲड प्रसन्नदादा जगताप यांच्यातर्फे महाप्रसाद संपन्न**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सासवडजवळील बोरगाव येथील श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर गेल्या अनेक वर्षांपासून तिसऱ्या श्रावणी गुरुवारी महाप्रसादाचा कार्यक्रम अत्यंत भक्तिभावाने आयोजित केला जातो. अखंड सुरू असलेल्या या परंपरेत दरवर्षी हजारो भाविक सहभागी होतात.

यंदाचा महाप्रसाद कार्यक्रम माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या आयोजनातून पार पडला. मोठ्या संख्येने भाविक गडावर दाखल होऊन कानिफनाथ महाराजांचे दर्शन घेतले आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. पुणे शहरातील विविध भागांमधून तसेच सिंहगड रोड परिसरातून असंख्य भक्त सहभागी झाले.



या कार्यक्रमासाठी वारजे येथील उद्योजक श्री. नथू खाडे साहेब यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच श्री. बाळासाहेब चरवड, श्री. नानासाहेब राऊत, श्री. सचिन कडू, श्री. तानाजी पाडळकर, श्री. सुरेश मते, श्री. गणेश कुटे, श्री. किशोर मुले, श्री. सुजित गायकवाड, श्री. किशोर कुलकर्णी, श्री. राहुल जोशी, श्री. संजय वर्मा, श्री. सिद्धाराम शिरोळे, श्री. भाऊसाहेब निकम, श्री. किरण कुलकर्णी, श्री. सर्वज्ञ परदेशी, श्री. शंकर सूर्यवंशी, श्री. पवन चोपडे, श्री. अविनाश खंडारे, श्री. यश मोघे, श्री. मोहन रांजेकर, श्री. राहुल जगताप यांचेही मोलाचे योगदान लाभले.

स्वादिष्ट आणि रुचकर महाप्रसादाने सर्व भक्तगण संततृप्त झाले. ही महाप्रसाद सेवा भाविकांसाठी अविस्मरणीय ठरली.

माजी उपमहापौर ॲड .प्रसन्नदादा जगताप यांनी स्वतः भाविकांना महाप्रसाद वाटप केले.

कार्यक्रमाच्या शेवटी कानिफनाथ मंदिर ट्रस्टच्या वतीने माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप आणि नथू मारुती खाडे यांचा सत्कार करण्यात आला.

संत कानिफनाथ महाराज हे नाथ संप्रदायातील एक प्रमुख संत असून, अध्यात्म, योगसाधना आणि भक्ति यांचा संदेश देणारे संत म्हणून ओळखले जातात. सासवडजवळील बोरगाव येथील गड हा त्यांचा प्रमुख समाधीस्थळ असून, वर्षभर भाविक येथे दर्शनासाठी येतात. विशेषतः श्रावण महिन्यात गडावर भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. सर्वांच्या प्रेमळ सहकार्यामुळे आणि ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या पुढाकारामुळे यंदाचा महाप्रसाद सोहळा भक्तिमय वातावरणात, यशस्वीपणे पार पडला. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## हिंगणेत 'हर घर तिरंगा'अभियान अंतर्गत तिरंगी ध्वज वाटप



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिंगणे येथे स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला देशभक्तीचा उत्साह ओसंडून वाहत होता. 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप व मित्र परिवार यांच्या वतीने नागरिकांना तिरंगा ध्वजांचे वाटप करण्यात आले. प्रत्येक नागरिकाच्या हातात तिरंगा पोहोचवून घराघरात देशप्रेमाचा संदेश देण्यात आला. या उपक्रमात महिला, युवक, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. तिरंगा स्वीकारताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर देशाच्या स्वातंत्र्याबद्दलचा अभिमान झळकत होता. वातावरणात 'वंदे मातरम' आणि 'भारत माता की जय'च्या घोषणांचा गजर होत होता. तिरंगा फक्त एक ध्वज नसून, तो आपल्या बलिदान, एकता आणि स्वाभिमानाचा जिवंत प्रतीक आहे, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले. नागरिकांनी स्वातंत्र्य दिनी आपल्या घरावर अभिमानाने तिरंगा फडकविण्याचे आवाहन माजी उपमहापौर ॲड.प्रसन्नदादा जगताप यांनी याप्रसंगी केले.

# सहकार मंत्रालयाचे अथक प्रयत्न उल्लेखनीय : दिलीप संघाणी

**केंद्रीय सहकार मंत्री श्री. अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली सहकारी संस्थांचा सर्वसमावेशक डेटाबेस तयार करण्याचे मंत्रालयाचे केलेले अथक प्रयत्न खरंच कौतुकास्पद आहेत. सहकार क्षेत्रात ६० हून अधिक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आले आहेत. सहकार मंत्रालयाची स्थापना झाल्यापासूनच्या अवघ्या चार वर्षांत या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती साधली गेली आहे.**



**(दै. आरंभ पर्व)**

केंद्रीय सहकार मंत्री श्री. अमित शहा यांनी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या "सहकार से समृद्धि" या दृष्टिकोनाची पूर्तता करण्यासाठी कोणतीही कसर सोडलेली नाही. मंत्रालयाच्या स्थापनेनंतरच्या या चार वर्षांत सहकार क्षेत्राने परिवर्तनशील प्रगती साधली आहे. श्री. शाह यांच्या नेतृत्वाखाली सहकार चळवळीतील उणिवा त्वरित ओळखून त्यावर उपाययोजना केल्या गेल्या तसेच या क्षेत्राला नवी दिशा देणारे महत्त्वपूर्ण सुधार केले गेले. याला भारताच्या सहकारी चळवळीतील दुसरी क्रांती म्हटले तरी अतिशयोक्ती ठरणार नाही.

या काळात ६० पेक्षा अधिक निर्णायक उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. सहकारी संस्थांचा डेटाबेस तयार करण्यासाठी मंत्रालयाचे प्रयत्न विशेष स्तुत्य आहेत. नमुना अधिनियमापासून उच्चस्तरीय संस्थांपर्यंत सर्व स्तरांवर सुधारणा करण्यात आल्या. कृषी, दुग्ध, मत्स्य व मीठ क्षेत्रांचा समावेश असलेल्या २ लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) स्थापण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, जेणेकरून सहकार प्रत्येक गावापर्यंत पोहोचेल.

सहकारी संस्थांमध्ये पारदर्शकता व कार्यक्षमता वाढविण्यासाठी पॅक्सचे संगणकीकरण वेगाने सुरू आहे. राज्यांच्या सहकार्याने सहकारी संस्थांचे पुनरुज्जीवन करण्याची जबाबदारी श्री. शाह यांनी स्वतः घेतली आहे. जुनाट सहकारी कायद्यांमध्ये योग्य सुधारणा करण्यात आल्या असून नव्या तरतुदींचा समावेश केला गेला आहे.

सहकार क्षेत्रातील कायदेशीर सुधारणांचा भाग म्हणून बहुराज्य सहकारी संस्था कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. तसेच सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र केंद्रीय सहकारी निवडणूक प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे.

पॅक्स सक्षम करण्यासाठी त्यांना व्यावसायिक उपक्रमांशी जोडले गेले आहे आणि विविध मंत्रालयांच्या योजनांचे एकत्रीकरण केले गेले आहे. सहकारी चळवळीत युवकांना आकर्षित करण्यासाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत. प्रशिक्षित व कुशल युवकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सरकारने देशातील पहिले त्रिभुवन सहकारी विद्यापीठ स्थापन केले असून यावर्षापासून ते कार्यरत होणार आहे.

येथे सहकारी व्यवस्थापन, नेतृत्व, उद्योजकता, डिजिटल गव्हर्नन्स व धोरण-निर्मिती अशा विषयांवरील विशेष अभ्यासक्रम राबविण्यात येतील. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष देत श्री. शाह यांनी सरकारी साखर कारखान्यांना खाजगी व सार्वजनिक कारखान्यांप्रमाणेच समान संधी मिळवून दिल्या आहेत. त्यांचे कर व आर्थिक अडथळे दूर करण्यात आले आहेत.

राष्ट्रीय स्तरावर बियाणे, निर्यात व सेंद्रिय शेती या क्षेत्रांसाठी तीन सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. भारताच्या अन्नसुरक्षेसाठी सहकार क्षेत्राने जगातील सर्वात मोठा धान्यसाठा प्रकल्प हाती घेतला असून ग्रामपंचायत स्तरावर साठवण सुविधा उभारण्याचे काम सुरू झाले आहे. पायलट प्रकल्प पूर्ण झाला असून पहिला टप्पा सुरू आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी सोप्या करण्याच्या दिशेने सहकारी संस्थांना किमान आधारभूत किमतीवर (MSP) खरेदी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. नाफेड व NCCF सारख्या सहकारी संस्था आता MSP दराने डाळी व तेलबिया खरेदी करत आहेत.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.